ePaper
मुख्यमंत्री शिंदे अलीबाबा! 'त्या' 40 जणांना घरी बसवणार: आदित्य ठाकरे




| वर्ष - 7 | अंक - 82 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- भारत-पाकिस्तान महामुकाबला
- 'गदर 2' चे मोशन पोस्टर रिलीज
- पीएम सीएमची ग्रेट भेट!
- पटोलेंचे नाना वक्तव्य!

www .mahaenews.com | रविवार, दिनांक 23 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 'सांडपाणी निचरा' व्यवस्था सक्षमीकरण!

## »महापालिका प्रशासानची तयारी : अद्ययावतीकरणासाठी 300 कोटींचा करणार खर्च

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक भागांतील ड्रेनेजलाइन (जलनि:सारण वाहिन्या) जुन्या झाल्याने त्या वारंवार तुंबण्याचे प्रकार वाढत आहेत. नाले व नद्यांना थेट ड्रेनेजलाइन जोडण्यात आल्याने जलप्रदूषण वाढत आहे. हे रोखण्यासाठी संपूर्ण ड्रेनेजलाइनचे जाळे आणि नैसर्गिक नाल्याचे सर्वेक्षण करण्यास सुरूवात झाली आहे. त्या आधारे ड्रेनेजलाइन अद्ययावत करण्यात येणार असून, त्यासाठी महापालिका सुमारे 300 कोटी खर्च करणार आहे.**



शहरात नगरपालिकेच्या काळातील सुमारे 35 वर्षांपूर्वीची ड्रेनेजलाइन आहेत. काही भागांत नव्याने ड्रेनेजलाइन टाकली आहे. काही भागांत अद्याप जुन्याच वाहिन्या आहेत. बैठे घरे व चाळी जाऊन आता, मोठ मोठ्या इमारती व हाऊसिंग सोसायट्या तयार झाल्या आहे. लोकवस्ती वाढल्याने मोठ्या प्रमाणात सांडपाणी तयार होते. मात्र, ड्रेनेजलाइनची क्षमता जुनीच असल्याने त्या तुंबण्याचे प्रकार वाढत आहेत. तसेच, नाले व स्टॉर्मवॉटर लाइनला ड्रेनेजलाइन जोडून सांडपाणी सोडून देण्यात आले आहे. ते सांडपाणी नदीत मिसळून जलप्रदूषण वाढत आहे.

### शहरात राबवणार इंदूर पॅटर्न...

» इंदूर शहराच्या धर्तीवर शहरातील सर्व ड्रेनेजलाइन व नाल्यांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. त्यासाठी डीआरए या एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. शहराचे चार भाग करून हे काम केले जात आहे.

» कॅमेऱ्यांची मदत घेऊन ड्रेनेजलाइन तपासले जात आहे. त्यासाठी क्षेत्रीय अधिकारी व अभियंत्यांचे सहाय्य घेण्यात येत आहे. सर्वेक्षणाची मुदत वर्षभराची आहे. मात्र, त्यापूर्वी काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

### सर्व्हेक्षणासाठी एजन्सी...

» सर्वेक्षणासाठी संबंधित एजन्सीला प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या दीड टक्के शुल्क दिले जाणार आहे.शहरात जुन्या, खराब व नादुरुस्त ड्रेनेजलाइन कोणत्या हे समजणार आहे. कोठे सांडपाणी तुंबते व का हे स्पष्ट होणार आहे. कोणत्या भागात ड्रेनेजलाइन थेट स्टॉर्मवॉटर लाइन व नाल्यास जोडण्यात आली आहे. कोणत्या भागात अधिक क्षमतेच्या ड्रेनेजलाइनची गरज आहे, हे समजणार आहे. ड्रेनेज व नाल्याचा संपूर्ण आराखडा तयार करून तो अहवाल संबंधित एजन्सी पालिकेस सादर करणार आहे.

---

# 'उन्नती' च्या सदस्यांचे भाजपाच्या कार्यात योगदान!

## »डॉ. कुंदा भिसे यांच्या भावना : पिंपळे सौदागर येथे रोपांचे वाटप

| पिंपरी | महाईन्यूज |

**कार्य कोणतेही असो त्या माध्यमातून उन्नतीने कायमच सामाजिक बांधिलकी जपली आहे. संकटकाळात समाजाप्रती जबाबदारीचे भान राखून तळागाळातील लोकांच्या मदतीला धावून जाणारा उन्नतीचा सदस्य भाजपाच्या प्रत्येक कार्यात योगदान देत आला आहे.**

पर्यावरण संवर्धनाला चालना मिळावी म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त



पिंपळे सौदागर येथे रोपांचे वाटप करुन नागरिकांच्या मनामध्ये समाजसेवेचे बीज पेरण्यात आले, अशी भावना उन्नती सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षा तथा भाजपच्या चिंचवड विधानसभा महिला मोर्चाच्या अध्यक्षा डॉ कुंदाताई भिसे यांनी व्यक्त केली. भाजपाचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त उन्नती सोशल फाऊंडेशनच्या वतीने पिंपळे सौदागर येथे रोप वाटप कार्यक्रम घेण्यात आला. शेकडो लोकांना यावेळी रोपांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे वृक्षारोपण करण्यासाठी वाव मिळत आहे. त्यामुळे हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी येथील दरड कोसळून मृत पावलेल्या नागरिकांना श्रध्दांजली वाहून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी उन्नती सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षा तथा भाजपा महिला मोर्चाच्या चिंचवड विधानसभा अध्यक्षा सौ. कुंदाताई भिसे, उद्योजक संजय भिसे, पि के स्कुल चे संस्थापक जग्गनाथ अप्पा काटे,ऑल सिटिझन असोसिएशनचे अध्यक्ष विलास जोशी, शंकर चोंधे,श्रीकृष्ण निलेगावकर, रमेश वानी आनंद हास्य क्लब आदी उपस्थित होते.

### पर्यावरणाचे रक्षण करणे काळाची गरज...

» डॉ. कुंदाताई भिसे म्हणाल्या, वाढत्या शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे. प्रदुषण वाढत असून मानवी आरोग्याला घातक वातावरण तयार होत आहे. त्यामुळे सुदृढ आरोग्यासाठी पर्यावरणाचे रक्षण करणे काळाची गरज बनली आहे. झाडे लावली पाहिजेत. त्याचे संगोपन केले पाहिजे. तरच, आपल्याला शुद्ध प्राणवायू मिळू शकतो. उन्नतीच्या माध्यमातून आम्ही पर्यावरण संवर्धनाची मुहूर्तमेढ रोवली. शेकडो रोपांची लागवड देखील केली. आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त प्रत्येकाच्या मनामध्ये पर्यावरण विषयक सकारात्मक बीज रोपन करण्यासाठी पिंपळे सौदागर परिसरातील सोसायटीधारकांना रोपांचे वाटप करण्यात आले. नागरिकांनी या रोपांचे चांगल्या ठिकाणी रोपन करुन त्याचे संगोपन करावे, असे आवाहन भिसे यांनी केले.

# शेतजमीन फसवणूक थांबणार!

## » आता कब्जेदार शेतकऱ्याचे तलाठी दफ्तरात 'सात ब'

### » महसूल विभाग नवं सॉफ्टवेअर आणणार

।पुणे/ जेजुरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**मूळ शेतकऱ्याची जमीन कायदेशीररीत्या प्रत्यक्ष कसणाऱ्या शेतकऱ्याचे नाव (कब्जाधारक) २००२पर्यंत सातबाऱ्यावर नोंदविले जात होते; परंतु सातबाऱ्यावरून मूळ मालकाचे नावच गायब होऊन फसवणुकीचे प्रकार होत होते. त्यामुळे सातबाऱ्यावर अशा नोंदी घेणे सरकारने बंद केले.**

मात्र, शेतकरी इतरांच्या जमिनी कसत असल्याने त्यांचे नाव 'सात ब' उताऱ्यावर येणे गरजेचे असल्याने मूळ शेतकऱ्यांचे अधिकार सातबारावर कायम ठेवून कब्जेदार शेतकऱ्याचे तलाठी दफ्तराच्या 'सात ब' उताऱ्यावर लावण्यासाठी नवी संगणक प्रणाली विकसित केली जात आहे. त्यामुळे कब्जेदार शेतकऱ्यास अनुदान किंवा कर्ज घेण्यास पुरावा म्हणून ही नोद उपयुक्त ठरणार आहे. परिणामी, मूळ मालकांची फसवणूकही टळणार आहे. पूर्वी एखाद्या व्यक्तीच्या मालकीची शेती असताना त्यांना नोकरी अथवा काही कारणास्तव ती करता (कसता) न आल्यास शेती पडीक राहायची. त्याला पर्याय म्हणून शेती कोणाला तरी करायला देण्याचा प्रकार सुरू झाला.

त्यातून शेती करायला देणाऱ्या मूळ शेतकऱ्यास कसणाऱ्याचे नाव सातबारा उताऱ्यावर यायला लागले. मात्र, त्यातून मूळ शेतकऱ्यांचेच नाव काढून त्यावर कसणारा शेतकरी स्वतःचा मालकी हक्क सांगत असे. त्यातून मूळ शेतकऱ्याची फसवणूक होत असल्याचे प्रकार आढळले. त्यामुळेच २००२मध्ये 'सात ब' उताऱ्यावर कसणाऱ्या शेतकऱ्याच्या नावाच्या नोंदी बंद करण्यात आल्या होत्या.तलाठी दफ्तरातील गाव नमुना 'सात ब'बद्दल फारशी माहिती नसल्याने त्याचा प्रभावी वापर होत नाही. त्यामुळे सातबाऱ्यावर कब्जा अथवा पीकपेरा आपल्या नावाने नोंदवावा, अशी मागणी महसूल; तसेच भूमी अभिलेख विभागाकडे करण्यात येत आहे. त्या मागणीची दखल घेऊनच राज्याच्या महसूल विभागाकडून गाव नमुना 'सात ब'साठी स्वतंत्र संगणक प्रणाली विकसित केली जात आहे. येत्या रब्बी हंगामात मूळ मालकाशिवाय कब्जेधारकाचे नाव त्या प्रणालीच्या माध्यमातून नोंदविता येणार आहे. शेती कसणाऱ्या कब्जेधारकाचे नाव नोंदविण्यासाठी ऑनलाइन अर्ज करावा लागणार आहे. या अर्जासोबत कब्जा कायदेशीररीत्या धारण केल्याबाबतचे पुरावे सादर करावे लागतील. त्यानुसार तहसीलदार मूळ शेतकरी किंवा जमीनधारक आणि संबंधित कब्जेधारकाला नोटीस काढील. कब्जा कायदेशीर असल्याची खात्री करून अशा शेती कसणाऱ्याचे नाव 'सात ब' उताऱ्यावर नोंदविता येईल. ही प्रक्रिया ऑनलाइन होणार आहे. जमीन कसण्यासाठी भाडेकरार अथवा करारनामाही 'सात ब' उताऱ्यावर नोंदवण्यासाठी वापरता येऊ शकेल. त्यात ठरावीक हंगाम किंवा काही वर्षांसाठी शेती करण्यास देण्यात येत आहे अथवा शेती कसली जाणार आहे, असा उल्लेख करून करार करता येणार आहे.



“ शेतकरी एकत्र येऊन सामूहिक शेती करण्यासाठी 'सात ब' हा उतारा त्यांच्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. महसूल विभागाकडून स्वतंत्र संगणक प्रणाली विकसित केली जात आहे. त्या प्रणालीद्वारे आता ऑनलाइन 'सात ब' उताऱ्यात मूळ मालकाशिवाय कब्जेधारकाचे नाव नोंदविता येणार आहे.

**- सरिता नरके, संचालक, माहिती-तंत्रज्ञान विभाग**

---

# वाहतूक नियमांचे उल्लंघन

## » बेशिस्त वाहन चालकांविरुद्ध कारवाई

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहन चालकांविरुद्ध न्यायालयाने कारवाईचा बडगा उगारला असून खटल्याच्या कामकाजाला उपस्थित न राहणाऱ्या 732 वाहनचालकांविरुद्ध पकड वॉरंट बजाविण्यात आले आहे, अशी माहिती पुणे वाहतूक पोलिस उपायुक्त विजय मगर यांनी दिली आहे.**

शहर, उपनगरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध पोलिसांनी कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

एकेरी वाहतूक, हेल्मेट परिधान न करणे, ट्रिपल सीट यासह विविध प्रकारच्या नियमभंग प्रकरणात पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.




### पोलिसांनी दिला अटकेचा इशारा

» पकड वॉरंट बजावण्यात आलेल्या वाहनचालकांनी आठ दिवसांत मोटार वाहन न्यायालयात उपस्थित राहून खटल्याचा निकाल लावून घेणे आवश्यक आहे. अन्यथा पोलिसांकडून वाहनचालकांना अटक करुन न्यायालयात हजर केले जाईल, असा इशारा वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी दिला आहे.

खटल्यांच्या कामकाजास उपस्थित न राहणाऱ्या संबंधित वाहनचालकांना न्यायालयाने नोटीस बजाविली असून, नोटीशीकडे कानाडोळा करणाऱ्या वाहनचालकांना आता न्यायालयाने दणका दिला आहे. जे वाहनचालक नोटीस बजावूनही न्यायालयात उपस्थित राहिले नाहीत.

अशा वाहनचालकांविरुद्ध पकड वॉरंट (अटक वॉरंट) जारी करण्यात आले आहे.

मोटार वाहन कायद्यांतर्गत वाहतूक विभागाने 2020 या वर्षापासून नियमांचा भंग केलेल्या वाहनचालकांना खटल्याच्या कामकाजास उपस्थित राहण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. न्यायालयीन कामकाजास अनुपस्थित राहणाऱ्या 732 वाहनचालकांना पकड वॉरंट बजावण्यात आले आहे.

---

# पुणे दर्शन' बससेवेतून 'पीएमपी' मालामाल

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) 'पुणे दर्शन' सेवेला उन्हाळी सुट्ट्याच्या काळात प्रवाशांनी मोठा प्रतिसाद दिला आहे. गेल्या तीन महिन्यांत 'पुणे दर्शन' बससेवेतून 'पीएमपी'ला १३ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. पुण्यात मोठ्या प्रमाणात येणाऱ्या पर्यटकांना शहरातील ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळांची सफर घडविण्यासाठी 'पुणे दर्शन' सेवा सुरू करण्यात आली आहे.'पुणे दर्शन' सेवेला एप्रिल, मे आणि जून या तीन महिन्यांत प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या तीन महिन्यांत सुट्ट्यांमुळे पुण्यासह बाहेरगावातून पुण्यात आलेल्या अनेक पर्यटकांनी 'पुणे दर्शन'मधून शहरातील विविध ठिकाणांची सफर केली. एप्रिल महिन्यात 'पुणे दर्शन' बस फक्त एक दिवस रद्द झाली होती. या महिन्यात तीन लाख ६० हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे, तर मे महिन्यात 'पुणे दर्शन'ला सर्वाधिक प्रतिसाद मिळाला आहे. या महिन्यात पाच लाख १२ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. जून महिन्यात चार लाख २७ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे.बसला प्रतिसाद 'पीएमपी'ने पुणे शहराप्रमाणेच पुणे जिल्ह्यातील पर्यटनस्थळांना भेटी देण्यासाठी शनिवार, रविवार आणि सरकारी सुट्टीच्या दिवशी एकदिवसीय पर्यटन बससेवा मे महिन्यापासून सुरू केली आहे. या सेवेचे सात मार्ग 'पीएमपी'ने जाहीर केले असून, सर्व मार्गांसाठी पाचशे रुपये तिकीट निश्चित केले आहे. सातपैकी तीन मार्गांवर सध्या बस सुरू झाली आहे. त्याला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. सासवड, नारायणपूर, बालाजी मंदिर, बनेश्वर मंदिर, कोंढणपूर या मार्गावरील बसला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# वाढदिवस नेत्यांचा; संकल्प पर्यावरण संवर्धनाचा!

## » पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे ‘वृक्षारोपण महाअभियान

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिनी पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे ‘वृक्षारोपण महाअभियान’ हाती घेण्यात आले आहे. त्या माध्यमातून परिसरात तब्बल ५३ हजार वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. यासाठी भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला आहे.**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, प्रगतशील विकासाचे शिल्पकार मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या ५३ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याच्या वतीने "सेवाकार्याचे आयोजन करण्यात आले. पिंपळे निलख विशाल नगर येथे या अभियानाची सुरवात करण्यात आली. याप्रसंगी आमदार उमाताई खापरे, माजी राज्यसभा खासदार अमर साबळे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य भाजपा सदाशिवजी खाडे, आमदार महेश लांडगे, आमदार उमा खापरे, मा.महापौर माई ढोरे, मा.सत्तारूढ पक्षनेते नामदेवजी ढाके, मा.नगरसेविका आरती चोंधे, भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा उज्वला गावडे आदी उपस्थित होते. शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, शहर आणि परिसरात पर्यावरणाचे रक्षण, राष्ट्राचे संरक्षण या संकल्पनेतून तब्बल ५३ हजार ऑक्सिजनपूरक वृक्षांची लागवड करण्याचे महाअभियान राबविण्यात आले आहे. तसेच, आधार कार्ड अपडेट सुविधा केंद्र अभियान, मोफत आरोग्य सेवा असे उपक्रम आयोजित केले आहे.




> उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्त राज्यभर सेवादिवस साजरा करण्यात येत आहे. पिंपरी-चिंचवड शहर स्वच्छ आणि सुंदर बनवण्याचा संकल्प केला असून, आगामी काळात पर्यावरणपुरक उपक्रमांवर भर देण्यात येणार आहे. या सेवा दिवसाच्या निमित्ताने भाजपाचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आप आपल्या कार्यक्षेत्रात सेवा उपक्रमात सहभागी झाले आहेत.
>
> **– शंकर जगताप,**
> **शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

### मोशीत वृक्षारोपण

» राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा व आमराई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने मोशी प्राधिकरण येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी भाजपा युवा मोर्चा उपाध्यक्ष शिवराज लांडगे म्हणाले की 'पिंपरी चिंचवड शहराच्या विकासाचा पुढील 50 वर्षांचा वेध घेत देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार महेशदादा लांडगे यांच्या माध्यमातून शहरात मोठ्या प्रमाणात पायाभूत विकासकामांना गती देण्यात आली.



# वृद्धाचे अपहरण अन् खून प्रकरणाचा छडा!

## » चिंचवड पोलिसांची कारवाई : तीन आरोपींच्या मुसक्या आवळल्या

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उसने दिलेले पैसे परत मागणाऱ्या चिंचवडगावातील वृद्धाचे अपहरण करून त्यांचा खून करुन मृतदेहाची ताम्हीणी घाटात विल्हेवाट लावणाऱ्या आरोपींना गुन्हे शाखा युनिट दोन व चिंचवड पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी जेरबंद केले आहे. नारायण बापूराव इंगळे (रा. चिंचवडगाव), राजेश नारायण पवार, समाधान ज्ञानोबा म्हस्के (दोघे रा. चिखली) अशी अटक आरोपींची नावे आहेत.**




याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, चिंचवड पोलीस स्टेशन येथे एका इसमास ठार मारण्याच्या उद्देशाने त्याचे अपहरण करुन जबरदस्तीने त्याच्याच ब्रेझा गाडी मधुन पळवून नेल्याचा गुन्हा चिंचवड पोलीस स्टेशन येथे दाखल होता. (गुन्हा रजि. नंबर ३१५/२०२३ भा.दं.वि. कलम ३६४, ३९२ ३४) या गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना त्यातील आरोपी नारायणला चिंचवड पोलीस स्टेशनच्या पथकाने ताब्यात घेतले. त्याचेकडे तपास केला असता, नारायण याने पंजाब सिंध बँकेत मॅनेजर या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या रणजित मेला सिंग (वय ७० वर्षे, रा. ओरा कौटी, प्लॅट नं. सी-१ प्लॅट नं. ९०४, उबाळे नगर, वाघोली, पुणे) यांच्याकडुन ३० लाख रुपये इसने घेतले होते. ते पसे परत दे म्हणुन रणजित सिंग यांनी नारायण इंगळे याच्याकडे सतत तगादा लावला. नारायणला ते पैसे परत करायचे नसल्याने त्याने त्याचे मित्र राजेश आणि समाधान यांना रणजित सिंग यांचा खून करण्यासाठी ४ लाख रुपयांची सुपारी दिली होती. नारायण याने रणजित सिंग यांना (दि. १९/०४/२०२३) पैसे देतो म्हणुन बोलावुन घेतले.

### चार लाख रुपयांची घेतली सुपारी...

» आरोपींनी सागितले की, त्याचा मित्र नामे नारायण याने त्यांना ४ लाख रुपयाची सुपारी दिली असुन त्या बदल्यात रणजित सिंग यास ठार मारुन त्यांच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची. नारायण इंगळे व राजेश पवार यांनी मागुन येवुन रणजित सिंग यांचा दोरीने गळा आवळुन व समाधान म्हस्के याने चाकुने चार ते पाच वेळा भोकसुन ठार मारले. त्यांनतर त्याचा मृतदेह प्लास्टिक मध्ये गुंडाळुन बेडशिटमध्ये बांधुन रणजित सिंग यांच्या लाल रंगाच्या ब्रेझा गाडीत टाकुन त्यांच्या मृतदेहाची विल्हेवाट ताम्हीणी घाटात धबधब्या जवळच्या नाल्यात टाकून व गाडी माणगाव एम.आय.डी.सी. परीसरात सोडल्याचे सांगितले. आरोपींनी मयत इसमाच्या मृतदेहाची विल्हेवाट लावलेले ठीकाण व गाडी सोडल्याचे ठीकाण दाखवुन दिले. त्याप्रमाणे पोलीसांनी मयत इसमाचा मृतदेह व गाडी ताब्यात घेतली असुन अधिक तपास चालु आहे.

# जावली तालुक्यातील आलेवाडीची भात लावणी...



विशेष

-संजय पवार, आलेवाडी
+91-7021325851

**जावली तालुक्यातील आलेवाडी गावात ज्वारी, भात, हरभरा इ. महत्वाची पिके घेतली जातात. त्यापैकी भात हे एक प्रमुख पीक असून भाताच्या अनेक जाती घेतल्या जातात त्यामध्ये आंबेमोहोर, इंद्रायणी, तामसाळ, वरंगळ, पनवेल, कर्जत, मेनका, दोडाक, चिमणसाळ इ. प्रकारचा भात पिकविला जातो तसेच पेरणीचा काळीसाळ ही केला जायचा हा भात खायला चविष्ट असायचा आता कोणी करीत नाही. शेतजमिनीची नैसर्गिक गुणवत्ता ही तांदूळ उत्पादनासाठी पोषक आहे.**

आलेवाडी हे गाव सुवासिक, चवदार तांदूळ पिकविणारे गाव म्हणून ओळखले जाते. विशेषतः इंद्रायणी भात पिकास पोषक असलेले मातीतील गुणधर्म येथील मातीत आहेत. आंबेमोहराप्रमाणेच सुगंधित, चवीला गोड, खाण्यास मऊ पण थोडा चिकट असलेल्या इंद्रायणी तांदळाची लोकप्रियता वाढू लागली आहे. अशा या गावातील भात पिकाचे महत्व आणी त्यापाठी भात लावणी कशी केली जाते ते जाणून घेऊया.

आलेवाडीला तिन्ही बाजूंनी डोंगर असल्यामुळे डोंगरातून असंख्य छोटे नाले, ओहोळ वाहत सखल भागात येतात तेव्हा ते भातखाचरात शिरकाव करतात ही भात खाचरे छोटी छोटी एकाखाली एक उभी आडवी ताली तुंबा घालून आपल्या पूर्वजांनी तयार केलेली आहेत. भात खाचराची जमीन मऊ लोण्यासारखी, चिकणमातीसारखी असते. याच भात खाचरातून उत्कृष्ट प्रतीचा तांदूळ आलेवाडीतील शेतकरी पिकवीत आले आहेत. राज्य पातळीवर



बक्षीस घेवून नावलौकिक मिळविला आहे. पावसाळा सुरु झाला की वेध लागतात तरवा टाकण्याचे त्यापूर्वी उन्हाळ्यात खाचरात नांगरट करून कुळव फिरवून जमिनीची मशागत केली जाते शेणखत पसरून टाकलं की पाऊस थोडा झाला की भात खाचराच्या मध्यभागी उंचवटा असेल तिथे तरवा (बियाणं) टाकलं जातं सुमारे 25 ते 30 दिवसात भाताची रोपे तयार होतात.

आषाढ श्रावण महिन्यात जोराचा पाऊस झाला आणी ओढ्याला तुडुंब भरून पाणी वाहू लागलं की भात खाचरं जलमय होतात खाचरांचे ठिकठिकाणी तलाव दिसू लागतात पाऊसाने वेग धरला की एका दमात भात लावणी उरकायची असते. अशी वर्षानुवर्षे परंपरा आहे कामानिमित्त शहरात गेलेली मंडळी भात लावायला गावात येतात शेतकऱ्यांना भातलावणी हा एक सोहळाच असतो. घरातल्या स्त्रिया लवकर उठून न्याहरी बनवतात मनोरंजनासाठी भल्लरीची गाणी म्हणतात. पावसाळ्यात हिरवाईने नटलेल्या डोंगराच्या कुशीत सुरु असलेली भात लावणी बघणं म्हणजे एक नेत्रसुखद सोहळा असतो. हिरवे डोंगर, पाण्याने भरलेले वाहते, ओढे यात लक्ष वेधून घेतात. ती भात खाचरे त्यात वाऱ्यावर डोलणारी हिरवीगार गच्च रोप,

भात लागणीची लगबग सुरु होते अगदी पहाटेच शेतकऱ्याचा दिवस सुरु होतो. झुंजु मुंजू व्हायच्या आतच शेतकरी आपली बैलजोडी घेवून भातखाचरांकडे जायला निघतो. सोबत चिखल करायचा नांगर, पाट्याळ घेतलं की एका बाजूने भातखाचरात चिखल करायला सुरुवात करतो. त्यापूर्वी तरवा काढणीचे काम स्त्रिया करीत तरवा काढतांना पिडे ठेवून त्यावर बसले की तरवा काढायला सोपं जाई मूठ बांधण्यापूर्वी मुळांचा चिखल खाचरातल्या पाण्यातच खंगळून काढायचा. आणी त्याच मुठीतल्या पात्यांनी सगळ्या रोपांना एकत्र बांधायचे गाठ एवढी सोपी की लावणी करतेवेळी एका हाताने वर सरकवली की रोपे खळकन मोकळी डाव्या हातात मूठ धरून उजव्या अंगठ्याने चिखलात रोपं खोवले की दुसरे खोवायचे. तरव्याच्या मुठी तयार करून व्यवस्थित बांधावर ठेवल्या की बांध हिरव्या मुठींनी सजला जायचा धो-धो पाऊस असेल तर अंगावर इरलं, खोळ, पोत घेऊन डोक्याला आणी कमरेला दोरीनं बांधून घेतलं की पटापट काम करायला सुरुवात केली जायची वरून जोराचा पाऊस व पाउसा बरोबरच मालदेव खिंडीतून सुटलेला वादळी वेगाचा भन्नाट वाऱ्याशी मुकाबला करीत काम करावं लागे. खरं म्हणजे भात लावणी हा एक योगाचा व्यायाम प्रकार आहे. कमरेत वाकून एकाग्र चित्ताने सलग काम करणे हे सोपं नाही.

पाण्याने आणी चिखलाने भरलेल्या भात खाचरात दोन बैलाचा नांगर उभा आडवा फिरवला जाई. हा नांगर वजनाने हलका असला तरी गुडघाभर चिखलात नांगर वेगाने हाकताना एका हाताने नांगर चिखलातून उचलून पुन्हा ठेवला जाई हे येऱ्या गबाळ्याचे काम नाही उभा आडवी नांगरट झाली की मऊसूत झालेला चिखलात पाट्याळ फिरविले जाई कुठेही राळ, ढेकळं राहू नयेत याची दक्षता घेतली जाई.

धो धो कोसळणाऱ्या पावसात दोन्ही टोकाकडे दोरी लावून एका रांगेत उभे राहून वाकून भाताची रोपे रोवली जातात हे दृष्य बघण्यासारखं असतं भात लावण्यापूर्वी गुळ भात दुधाचा नैवेद्य दाखवूनच भात लावणीस सुरवात होते. भल्लरीची गाणी म्हणत जलद गतीने भात लावणीचा आनंद अवर्णनीय असतो. खाचराच्या मध्यभागी आल्यावर रोपाची अक्खी मूठ "कणंग" म्हणून रोवली जाते या पाठीमागे घरात असणाऱ्या कणगी भराव्या अशी अपेक्षा असते. कष्ट केलेल्या श्रमाचं फळ मिळावं. शिवारात सगळीकडे भल्लरीच्या गाण्यांनी वातावरणात नादमय सूर भरला जातो. मंजूळ स्वर कानी पडतात सगळ्या शिवारात घाईगडबड चाललेली असते.

## संपादकीय »

### माझ्या मना, बन दगड!

***तलाठी हे काही सरकारी नोकरीतील उच्च पद नव्हे, तरीही उच्चशिक्षित तरुणांची गर्दी तलाठी भरतीसाठी दिसली; याला काय म्हणावे?***

खासगी नोकरीत वेतन जास्त पण नोकरी टिकेलच याचा भरवसा नाही, कितीही कर्तबगारी दाखवली तरी वारंवार येणारे मंदीचे सावट कधी कवटाळेल याची शाश्वती नाही. अशा स्थितीत 'एकदा चिकटलो की निवृत्तीपर्यंत चिंता नाही' असे स्वरूप असलेल्या सरकारी नोकरीकडे आजची सुशिक्षित- उच्चशिक्षित तरुणाई धाव घेत असेल तर त्यात वावगे काही नाहीच. पण या सरकारी संवर्गापैकी 'तलाठी' हे तसे कनिष्ठ पद. या पदाचा मोह केवळ शिक्षितच नाही तर अति उच्चशिक्षितांना कसा काय पडला? अभियांत्रिकी, विज्ञान यांत पारंगत असलेले तरुण कसे काय या पदाच्या प्रेमात बुडाले? त्यांच्या कुशलतेचा मग उपयोग काय? हेदेखील तलाठीपदाचेच उमेदवार, म्हणजे केवळ याच पदासाठी पात्र असलेल्या उमेदवारांवर अतिक्रमण नाही का? जमिनींच्या कारभारावर, 'सातबारा'वर नियंत्रण ठेवणाऱ्या तलाठ्याला वरकमाईची संधी असते.

**राज्यातील महाविकास आघाडी अधिक मजबूत होऊन निवडणुकात उत्तम परिणाम बघायचा असेल तर बाळासाहेब आंबेडकर हे त्यांच्या सोबत असायला हवेत. मागील लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना मिळालेली मते आणि त्याचा परिणाम होऊन काँग्रेसच्या पडलेल्या जागा बघितल्या तर आंबेडकर हा अत्यंत प्रभावी फोर्स आहे याची सत्यता कुणालाही पटेल.**

## आंबेडकर आणि काँग्रेस...

ज्या वेळी आंबेडकरी मतदार काँग्रेस सोबत येतात तेव्हा केवळ बौद्धच येत नाहीत तर त्यांच्या सोबत जुळलेला अठरा पगड जातींचा आणि भटक्या विमुक्तांचा मोठा वर्ग जुळत असतो. देशपातळीवर मोदी,संघ परिवार आणि कट्टर समूहाचे जे काही सुरू आहे,ते विचार करणाऱ्या कुणालाही नव्याने समजून सांगण्याची गरज नाही,सतत दोन टर्म मोदी आणि भाजप विजयी झाल्याने तिसऱ्या वेळीही काहीही करून त्यांना सत्ता हवी आहे, राम मंदिर,370 झाले आहे आता समान नागरी कायदा आला की वचन नाम्यातील जुनी आश्वासने पूर्ण होतात. आता पुढे काय असा प्रश्न आपल्याला पडला असला तरी भाजपला नाही पडत कारण त्यांची यादी मारुतीच्या शेपटी सारखी वाढत असते.काशी,मथुरा बाकी आहेच,त्यासाठी जमीन तयार केली जात आहे,इतिहास बदलला जातोय,उत्क्रांती त्यांना नकोय,वैज्ञानिक आणि संशोधन क्षेत्रात बजेट कमी केले आहे,परिवारातील भगिनी संघटना ज्या हिंदुराष्ट्राचे स्वप्न बघत आहेत,ते अधिकृत कुणी सत्ताधारी नाकारत नाही. मनमानी निर्णय घेऊन ते फसले तर त्यावर





कुणीही प्रश्न उपस्थित करू नये अशी मोदींनी व्यवस्था निर्माण केली आहे,सगळ्या मंत्री मंडळाने ती मान्य केली आहे,या स्थितीत संविधान वाचेल की नाही ? लोकशाही जिवंत राहणार की नाही ? याबद्दल मोठा वर्ग संशय व्यक्त करीत आहे.अशावेळी यावेळी लोकसभा निवडणुकीत इंडिया जिंकणे काळाची गरज झाली आहे,त्यासाठी सगळ्या फुले, शाहू आंबेडकरी विचारांच्या पक्ष आणि सामाजिक,सांस्कृतिक संघटनांनी महाविकास आघाडी कशी मजबूत होईल यासाठी आतून प्रयत्न केले पाहिजेत. ॲड.आंबेडकर यांना सोबत घेण्याची काँग्रेसची इच्छा आहे,राज्यातील अनेक पहिल्या फळीतील नेत्यांशी जेव्हा चर्चा होते तेव्हा त्यांचा कल दिसतो मात्र त्या सोबत ते काही पण,परंतु मागे ठेवतात,त्यांचा विचार दुसऱ्या बाजूने ॲड.आंबेडकरांनी यावेळी करायला हवा.सध्या आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी उद्धव ठाकरे यांच्यासोबत असली तरी त्यांच्यात अजून तरी फेविकोल जोड तयार झाला नाही. महाविकास आघाडी एकसंघ राहीली आणि त्यात आंबेडकर सामील झाले तर लोकसभा आणि विधानसभा अश्या दोन्ही मैदानात आघाडी नक्कीच आपला झेंडा रोवेल यात संशय नाही . त्यासाठी आता बाळासाहेब आंबेडकर काळाची गरज ओळखून काही पावले मागे जाण्याची गरज पडली तरी त्यात मागेपुढे बघू नये. जागांची मोठी यादी ते देतात असा कांग्रेसचा आक्षेप असतो त्याचा विचार केल्यास त्यात तथ्य दिसते, लोकसभेचा विचार केल्यास वंचितने चार,पाच जागांवर तडजोड करायला हवी, असे झाले तर वंचितच्या सगळ्या जागा निवडून येतील आणि सर्वात महत्वाचे म्हणजे बाळासाहेब केंद्रात कॅबिनेट मंत्री म्हणून दिसतील.

## ।। अभंगवाणी ।।



हाचि नेम आतां न फिरें माघारी ।
बैसलें शेजारीं गोविंदाचे ॥१॥

घररिघी जालें पट्टराणी बळें ।
वरिलें सांवळें परब्रम्ह ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पीएम सीएमची ग्रेट भेट!

## » शिंदेंनी सांगितला पंतप्रधानांसह झालेल्या चर्चेचा तपशील

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज आपल्या पूर्ण कुटुंबासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. अचानक ही भेट का झाली असेल? यावर चर्चा सुरु झाल्या. त्यानंतर आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच माध्यमांना ही सदिच्छा भेट होती असं सांगितलं.**

त्याचप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदींशी झालेल्या चर्चेचा तपशीलही स्पष्ट केला. महाराष्ट्रात जे प्रकल्प सुरु आहेत त्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा झाली.

तसंच इर्शाळगडच्या घटनेचीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवर्जून चौकशी केली. एवढंच नाही तर सर्वतोपरी मदतीचं आश्वासनही दिलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धारावीच्या प्रकल्पाची आवर्जून आठवण काढली. धारावी हा आशिया खंडातला सर्वात मोठा प्रकल्प आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर लोकाचं जीवनमान उंचावेल असंही मोदी म्हणाले तसंच हा प्रकल्प लवकर पूर्ण व्हावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सांगितलं.

महाराष्ट्रातले पुनर्वसनाचे प्रकल्प आणि एमएमआरडीएचे प्रकल्प यांना चालना देण्याच्या संदर्भातही या भेटीत चर्चा झाली. आपल्या हक्काचं घर असावं हे प्रत्येक माणसाचं स्वप्न असतं त्या अनुषंगाने चांगली घरं उभी करणं हे सरकारचं काम असतं. त्यावर आम्ही चर्चा केली. केंद्र सरकारकडून विकास कामांना पूर्ण मदत केली जाईल असं आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिल्याचं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

### कुटुंबासह घेतली सदिच्छा भेट

» "आज संपूर्ण कुटुंबासह मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. ही सदिच्छा भेट होती. ही भेट खूप चांगल्या पद्धतीने झाली. आम्हाला पंतप्रधान मोदींनी बराच वेळ दिला. मी यासाठी त्यांचा आभारी आहे. या दरम्यान राज्यात काय काय घडतं आहे? या विषयीही आम्ही चर्चा केली. पाऊस आणि इर्शाळगड यासंबंधीही आम्ही चर्चा केली." असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांना सांगितलं.आज आमच्या चार पिढ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटल्या याचा मला निश्चितच आनंद आहे. आज माझी आई हवी होती असं मला आवर्जून वाटतं आहे. माझे वडील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटून आनंदी झाले आहेत. असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी माध्यमांना सांगितलं. माझ्या वडिलांना आनंद झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटायचं ही त्यांचीही इच्छा होती. आज आमच्या चार पिढ्या एकत्र होत्या. पंतप्रधान मोदी माझ्या नातवाबरोबरही गप्पा मारल्या आणि खेळले त्याचाही मला विशेष आनंद आहे. असंही मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.

# पुण्यासह ५ जिल्ह्यांना रेड अलर्ट

## » 10 जिल्ह्यांत ऑरेंज अलर्ट आणि 15 जिल्ह्यांना येलो

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज



**महाराष्ट्राला आठवड्याभरापासून मुसळधार पावसाने झोडपून काढलं आहे. अद्यापही पावसाचा जोर कायम असून पुढच्या २४ तासांत राज्यातील महत्त्वाच्या शहरांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान खात्याकडून राज्यात पावसाचा जोर आणखी वाढेल, असा इशारा देण्यात आला आहे.**

त्यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना पावसाचा अंदाज घ्यावा अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, आज शनिवारी सकाळपासूनच सर्वत्र पावसाची जोरदार बॅटिंग सुरू आहे.

अशात आज ५ जिल्ह्यांना हवामान खात्याकडून रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई IMD ने जारी केलेल्या अंदाजानुसार, पालघर, ठाणे, पुणे, चंद्रपूर आणि गडचिरोली या ५ जिल्ह्यांना आज २४ तासांचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. यामुळे या भागांमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

कोकणात सर्वत्र धुवांधार पाऊस सुरू असून रत्नागिरी आणि सिंधुदूर्गमध्ये जोरदार पाऊस सुरू आहे. अशात हवामान विभागाकडून आज रत्नागिरीला पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर रायगड, सिंधुदुर्ग, सातारा, जळगाव, नांदेड, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांनाही आज ऑरेंज अलर्ट आहे. त्यामुळे या भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

### मणिपूर सरकार बरखास्त करा

» हवामान खात्याकडून जारी करण्यात आलेल्या माहितीनुसार, आज राज्यातील १५ जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यानुसार, नंदुरबार, धुळे, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, परभणी, वाशिम, बुलढाणा, अकोला, अमरावती, कोल्हापूर या तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर सोलापूर आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर अतिशय कमी असेल अशी माहिती हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.

# पैनगंगा नदीला पूर

। यवतमाळ ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

राज्यातील अनेक शहरांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाच्या सरी बरसत आहेत. विदर्भात पावसाने रौद्ररूप धारण केले आहे. यवतमाळमध्ये पावसाचा जोर वाढल्याने आनंदनगर तांडा येथे 80 जण पुराच्या पाण्यात अडकले. तर, घराची भिंत कोसळून दोघांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. बचावकार्यासाठी राज्य शासनाने हवाई दलाचे 2 MI-17 हेलिकॉप्टरर्स मागवलेत. 2 पैकी 1 हेलिकॉप्टर घटनास्थळी पोहोचले आहेत. यापैकी एक हेलिकॉप्टर खडगा गावालगतच्या महामार्गावर उतरले आहे. तर दुसरे गावावर घिरट्या मारत आहे. दरम्यान, तासाभराच्या बचावकार्यात 80 पैकी 65 जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. तर अन्य लोकांच्या बचावासाठी एनडीआरएफचे पथक मदत करत आहेत. मुसळधार पावसामुळे यवतमाळच्या बेंबळा धरणाचे 10 दरवाचे उघडण्यात आलेत. यामुळे नदीला पूर आल्यामुळे महागावाला पुराचा वेढा पडला आहे. गावातील तब्बल 80 गावकरी अडकले आहेत. यात काही लहान मुले व महिलांचाही समावेश आहे. या ठिकाणी गावकऱ्यांना एका छोट्या रस्त्याने बाहेर काढण्याचा प्रयत्न केला जात होता. पण आता या कामी हेलिकॉप्टरची मदत घेतली जात आहे. संग्रामपूर तालुक्यात सुरू असलेल्या संततधार मुळे संग्रामपूर तालुक्यातील केदार नदीला पूर आला असून नदी दुथडी भरून वाहत आहे. या परिणामी बावनबीर, टूनकी गावांचा संपर्क तुटला असतानाच घरात पाणी घुसले आहे.जिल्ह्यातील अनेक ठिकाणी मध्यरात्रीपासून हजेरी लावली आहे.मुसळधार पावसामुळे पैनगंगा नदीला पुर आला आहे. या पुराचा फटका अनेक गावांना बसला आहे. पुराने परिसरात वेढा घातल्याने अनेक जण पाण्यात अडकलेत. महागाव तालुक्यातील आनंद नगर येथील नागरिक पुराच्या पण्यात अडकले आहेत. त्यांचे बचावकार्य सुरू आहे.

# पटोलेंची नाना वक्तव्य!

## » आदिवासींत भांडण लावून मणिपूर जाळले

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने 2 आदिवासी समाजांत भांडण लावून मणिपूर जाळले, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शनिवारी केला. ते नागपूरमध्ये बोलत होते. सद्यस्थितीत महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण देशात कुणीही आनंदी नाही.**



गत 80 दिवसांपासून मणिपूर जळत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी परदेशांत फिरत होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह निवडणूक आहे, म्हणून छत्तीसगडला गेले.

पण मणिपूरची आग विझवण्यासाठी कुणीही गेले नाही, असे नाना पटोले म्हणाले. यावेळी त्यांनी राज्यातील शिंदे - फडणवीस - पवार सरकारवरही निशाणा साधला. ते म्हणाले की, हे सरकार हवेत आहे. जमिनीवर यायला तयार नाही. कुणाला फोडायचे अन् त्यासाठी दिल्ली वाऱ्या करायच्या यातच, ते व्यस्त आहेत.

त्यांनी जनता वाऱ्यावर सोडली आहे. सरकारने बजेटमधील तरतुदींचे पंचामृत म्हणून वर्णन केले. शेतकऱ्यांना भरीव मदत करण्याची ग्वाही दिली. पण शेतकऱ्यांना कोणतीही मदत मिळाली नाही. त्यांचे कर्ज माफ झाले नाही.

सरकारचे धोरण शेतकरी विरोधी आहे. महाबीजकडून बोगस बियाणे येणे ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. सरकार शेतकरी आत्महत्यांचा खरा आकडा दाबत असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. सरकारने माधव गाडगीळ समितीची शिफारस मंजूर केली असती, तर इरशाळवाडीसारखी घटना घडली नसती, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

विशेषतः विरोधी पक्षनेत्याचा मुद्दा लवकरच निकाली काढली जाईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### 3 पक्षांच्या सरकारमुळे जनतेत अस्वस्थता

**» मणिपूरच्या घटनेमुळे देशाला कलंक लागला**

**मणिपूरमुळे देशाला कलंक लावण्याचे काम मोदी सरकारने केले. भाजपला सत्तेचा माज आला आहे. 80 दिवसांपासून मणिपूर धुमसत आहे. पण पंतप्रधान 80 व्या दिवशी बोलले.**

**» ते परदेशांत फिरत राहिले. पण मणिपूरला गेले नाहीत. राहुल गांधी त्याठिकाणी जाऊन आले, असे नाना पटोले म्हणाले. महाराष्ट्रातील 3 पक्षांच्या सरकारमुळे जनतेत अस्वस्थता वाढल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.**

# पश्चिम बंगालमध्ये महिलांना मारहाण

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मणिपूरमध्ये गावात दोन महिलांची विवस्त्र धिंड काढल्याचा व्हिडिओ तीन दिवसांपूर्वी व्हायरल झाला होता. अशीच एक घटना पश्चिम बंगालमधील मालदा येथेही घडल्याचे उघडकीस आली आहे. येथे जमावाने दोन महिलांना बेदम मारहाण केली आणि नंतर त्यांना अर्धनग्न केले.**

ही घटना 19 जुलैची आहे. त्याचा व्हिडिओ शनिवारी समोर आला. महिलांच्या एका टोळक्याने दोन महिलांना घेरल्याचे व्हिडिओमध्ये दिसत आहे. या महिलांचे केस ओढले जात असून त्यांना चप्पलने मारहाण केली जात आहे. यानंतर त्यांचे कपडेही फाटले. भाजपच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी हा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. त्यांच्या मते, ही घटना मालदातील बामनगोला पोलिस स्टेशनच्या पाकुआ हाट भागात घडली. दोन्ही पीडित महिला आदिवासी आहेत. मालवीय यांनी आरोप केला की, जेव्हा त्यांना मारहाण केली जात होती आणि त्याचे कपडे फाडले जात होते तेव्हा पोलिस प्रेक्षक बनून उभे होते. सध्या याबाबत पोलिसांकडून अधिकृत माहिती आलेली नाही. पश्चिम बंगालमध्ये महिलांवर अत्याचाराची ही पहिलीच घटना नाही. पंचायत निवडणुकीतील हिंसाचाराच्या वेळीही एका महिलेची विवस्त्र परेड काढण्यात आली होती. शुक्रवारी, हुगळी जिल्ह्यातील भाजप खासदार लॉकेट चॅटर्जी यांनी सांगितले की, 8 जुलै रोजी झालेल्या पंचायत निवडणुकीदरम्यान भाजप उमेदवारावर टीएमसी कार्यकर्त्यांनी लैंगिक अत्याचार केले होते. त्या घटनेचा उल्लेख करत लॉकेट चॅटर्जीही रडू लागला.

हावडा जिल्ह्यातील दक्षिण पंचला भागात ही घटना घडली.

# 40 प्रवाशांना घेऊन जाणारी बस अडकली

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

उत्तरकाशी आणि कारगिलमध्ये रात्री उशिरा ढगफुटी झाली. यमुनोत्री महामार्गावर दरड कोसळली. अनेक वाहने गाडली गेली. शाळांमध्येही मलबा साचला आहे. मुलांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. उत्तर प्रदेशातील बिजनौरच्या मांडवली येथे कोतवाली नदीच्या पाण्याची पातळी वाढल्याने एक बस पाण्याच्या प्रवाहात अडकली. बसमध्ये सुमारे 40 प्रवासी होते. जेसीबीने सर्वांची सुटका करण्यात आली. हवामान खात्याने येत्या २४ तासांत डेहराडून, उत्तरकाशी, टिहरी, पौरी आणि नैनितालमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

एसडीआरएफ आणि अग्निशमन दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. दुसरीकडे राजस्थानच्या जोधपूर आणि बिकानेरमध्ये जोरदार पाऊस झाला आहे. जोधपूरमध्ये पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे दुचाकी, स्कूटी आणि स्वार रस्त्यावर वाहून गेले. 2 तासात 66.8 मिमी पाऊस झाला. दुसरीकडे, महाराष्ट्रातील पालघर, मुंबई, ठाणे, रायगड आणि रत्नागिरीमध्ये पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. रायगडच्या इरशाळगडमध्ये दरड कोसळून मृतांची संख्या 22 वर गेली आहे. हवामान खात्याच्या ऑरेंज अलर्टमध्ये हिमाचल प्रदेशात काल रात्रीपासून मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी दरड कोसळण्याच्या घटना घडत आहेत. नद्या, नाले तुंबले आहेत. अनेक ठिकाणी पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. रोहडू येथे तीन जण पुरात बेपत्ता झाले. तर कोटखई येथे दोघांचा मृत्यू झाला आहे. दिल्लीत पुन्हा एकदा यमुनेच्या पाण्याच्या पातळीने धोक्याचा टप्पा ओलांडला आहे.

# 87 हजार भारतीयांनी नागरिकत्व सोडले

## » गंभीर वास्तव: बहुतांश नागरिक अमेरिकेत गेले

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**या वर्षी जूनपर्यंत भारतातील 87 हजार लोकांनी नागरिकत्व सोडले आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी ही माहिती दिली. संसदेत दिलेल्या लेखी उत्तरात जयशंकर म्हणाले - 2011 पासून आतापर्यंत 17.5 लाख लोकांनी भारतीय नागरिकत्व सोडले आहे. यातील बहुतांश लोक अमेरिकेत जातात.**



लोकसभा खासदार पी चिदंबरम यांनी परराष्ट्रमंत्र्यांना विचारले होते की, गेल्या तीन वर्षांत किती भारतीयांनी नागरिकत्व सोडले आहे? यानंतर, त्यांनी कोणत्या देशांचे नागरिकत्व घेतले आणि नागरिकत्व सोडणाऱ्यांची संख्या 12 वर्षांत सर्वाधिक आहे का? जयशंकर म्हणाले की, गेल्या दोन दशकांमध्ये मोठ्या संख्येने भारतीय नागरिक जगात वर्कप्लेसच्या शोधात आहेत. अनेकांनी सोयीसाठी इतर देशांचे नागरिकत्व घेतले आहे. परराष्ट्रमंत्र्यांनी सांगितले की 2020 मध्ये 85 हजार, 2021 मध्ये 1.63 लाख आणि 2022 मध्ये 2.25 लाख भारतीयांनी त्यांचे नागरिकत्व सोडले होते. ते म्हणाले की, सरकारने या प्रकरणाची दखल घेतली असून मेक इन इंडिया अंतर्गत अनेक प्रयत्न केले आहेत, जेणेकरून देशात राहून नागरिकांच्या कलागुणांना वाव मिळू शकेल.

सरकारने कौशल्य आणि स्टार्टअपलाही प्रोत्साहन दिले आहे. जयशंकर म्हणाले-परदेशात असलेला भारतीय समुदाय ही आपली संपत्ती आहे. त्यांच्याशी चांगले संबंध निर्माण करण्यासाठी आम्ही सातत्याने पावले उचलत आहेत. ते म्हणाले की, सरकारने भारतीय डायस्पोरासोबत जोडण्यासाठी अनेक बदल लागू केले आहेत. प्रभावशाली भारतीय डायस्पोरा ही आमच्यासाठी एक संपत्ती आहे आणि आम्ही त्यांच्या माध्यमातून देशाच्या विकासासाठी पावले उचलत राहू.

### भारतात दुहेरी नागरिकत्व नसणे

नागरिकत्व सोडणाऱ्यांच्या संख्येत वाढ होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे भारतातील नागरिकत्वाशी संबंधित नियम. संविधान दुरुस्ती नागरिकत्व कायदा 1955 नुसार भारतात दुहेरी नागरिकत्व नाही. म्हणजेच भारताचे नागरिकत्व असलेली व्यक्ती इतर कोणत्याही देशाचे नागरिकत्व मिळवण्यास पात्र नाही. अशा परिस्थितीत लोक परदेशात गेले, तेथे व्यवसाय थाटले आणि तेथील नागरिकत्व मिळवले. यामुळे त्यांचे भारतातील नागरिकत्व आपोआप संपुष्टात येते.

# 'गदर 2' चे मोशन पोस्टर रिलीज

सनी देओल आणि अमिषा पटेल 2001 मध्ये रिलीज झालेल्या 'गदर' चित्रपटाचा रिमेक 'गदर 2' घेऊन येत आहेत. चित्रपटाच्या निर्मात्यांनी शुक्रवारी चित्रपटाचे नवीन मोशन पोस्टर रिलीज केले. या पोस्टरमध्ये सनी आणि उत्कर्ष शर्मा सीमेवर धावताना दिसत आहेत. सनी, तारा सिंग आणि उत्कर्ष या चित्रपटात त्यांचा मुलगा जीतच्या भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाचे नवीन मोशन पोस्टर शेअर करताना निर्मात्यांनी लिहिले की, 'वडिलांच्या प्रेमाला मर्यादा नसते.' व्हिडिओमध्ये सनी आणि उत्कर्ष भारत-पाकिस्तान सीमेवर धावत असून चारही बाजूंनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या जात आहेत. हे पोस्टर शेअर करताना सनी देओलने



लिहिले की, 'आपल्या देशाचे आणि कुटुंबाचे रक्षण करण्यासाठी हा तारा सिंग प्रत्येक आव्हानाचा सामना करण्यास तयार आहे.' त्याच्या या पोस्टरवर फॉलोअर्सनी कमेंट सेक्शनमध्ये उत्साह दाखवला आहे. एका यूजरने कमेंट केली की, 'मी अनेक वर्षांपासून या चित्रपटाची वाट पाहत होतो. मी खूप उत्सुक आहे. दुसऱ्या यूजरने लिहिले की, 'जर पोस्टर्स इतके खतरनाक असेल तर चित्रपट कसा असेल?' अनिल शर्मा दिग्दर्शित हा चित्रपट 11 ऑगस्ट रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. सनी देओल, अमिषा पटेल आणि अनिल शर्मा यांचा मुलगा उत्कर्ष शर्मा या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत आहे. उत्कर्षने 2018 मध्ये 'जीनियस' चित्रपटाद्वारे पदार्पण केले.

# एअरपोर्टवर मुलीसोबत ऐश्वर्या



अलीकडेच ऐश्वर्या राय बच्चन आणि अभिषेक बच्चन त्यांची मुलगी आराध्यासोबत मुंबई विमानतळावर दिसले. यासंबंधीचे व्हिडिओही सोशल मीडियावर समोर आले आहेत. या व्हिडिओमध्ये आराध्या एअरपोर्टमधून बाहेर पडताना पापाराझींना नमस्ते म्हणताना दिसत आहे. यावेळी अभिषेक बच्चन ग्रे स्वेटशर्ट आणि ब्लू जीन्स आणि व्हाइट स्नीकर्समध्ये दिसला. त्याने कॅप आणि सनग्लासेसही घातले होते. तर ऐश्वर्या ब्लॅक आउटफिटमध्ये दिसली. आराध्यानेही जांभळ्या स्वेटशर्टसह निळ्या जीन्स आणि स्नीकर्स परिधान केले होते. व्हिडिओमध्ये अभिषेक बच्चन सर्वात आधी विमानतळाबाहेर येताना दिसत आहे. त्याच्या मागे ऐश्वर्या-आराध्या येत आहेत. विमानतळाच्या टर्मिनल इमारतीतून बाहेर पडताना आराध्याने तिचे दोन्ही हात जोडले आणि नमस्ते म्हणत पापाराझींना अभिवादन केले. यानंतर ऐश्वर्या-आराध्या कारच्या दिशेने जाताना पापाराझीकडे पाहून हसताना दिसल्या. गाडीत बसण्यापूर्वीच आराध्याने तिच्या दिशेने येणाऱ्या पापाराझीला नमस्कार केला! त्याचवेळी ऐश्वर्याने पापाराझींसोबत हसतमुख संवादही साधला. सोशल मीडियावर या व्हिडिओवर चाहते आराध्याचे कौतुक करत आहेत. एका यूजरने व्हिडिओवर लिहिले - ऐश्वर्याची मुलगी खूप गोड आहे. त्याचबरोबर एका यूजरने लिहिले की, आराध्या भविष्यात खूप सुंदर दिसणार आहे.

# साराने शेअर केला अमरनाथचा व्हिडिओ

सारा अली खान गुरुवारी अमरनाथला पोहोचली. तिने बाबा बर्फानीचे दर्शन घेतले. तिने या अमरनाथ यात्रेचा व्हिडिओही शेअर केला आहे. व्हिडिओमध्ये सारा काठीच्या सहाय्याने मंदिराच्या चालत असल्याचे पाहायला मिळत आहे.यासोबतच ती हर हर महादेवच्या घोषणा देताना दिसत आहे. जम्मू-काश्मीरमध्ये थंडी असल्याने सारा उबदार कपड्यांमध्ये दिसत आहे. तिच्या आजूबाजूला इतरही काही आहेत. मंदिरात प्रवेश करताना, सारा पारंपारिकपणे तिच्या डोक्यावर स्कार्फ घेते, असेही पाहायला मिळाले. गेल्या महिन्यात साराला महाकालच्या दर्शनासाठी गेल्याने ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता. तरीही तिला फारसा फरक पडला नाही. अमरनाथ धाम हे जम्मू आणि काश्मीरमधील हिमालयाच्या कुशीत असलेली एक एक पवित्र गुहा आहे. हे हिंदूंचे पवित्र स्थान मानले जाते. अमरनाथच्या पवित्र गुहेत भगवान शिव बर्फाच्या शिवलिंगाच्या रूपात विराजमान आहेत असे मानले जाते. बर्फापासून शिवलिंगाची निर्मिती झाल्यामुळे याला 'बाबा बर्फानी' असेही म्हणतात. पवित्र गुहा बर्फाचे पर्वत, हिमनद्या यांनी वेढलेले आहे. उन्हाळ्यातील काही दिवस वगळता ही गुहा वर्षभर बर्फाने झाकलेली असते. या दिवसांतच ती दर्शनासाठी खुली होते. विशेष म्हणजे या गुहेत दरवर्षी बर्फाचे शिवलिंग नैसर्गिकरित्या तयार होते. गुहेच्या छतावरील भेगा पडलेल्या पाण्याच्या थेंबांच्या थेंबामुळे बर्फाचे शिवलिंग तयार होते.



# एल्विश-अविनाशचा वाद

सध्या बिग बॉस ओटीटीमध्ये खूप गोंधळ पाहायला मिळत आहे. शोमध्ये वाईल्ड कार्ड एन्ट्री घेणारा स्पर्धक एल्विश यादव आणि अविनाश सचदेव यांच्यात जोरदार वादावादी झाली. त्यानंतर एल्विशचे चाहते सोशल मीडियावर अविनाशला ट्रोल करत आहेत. त्याच्या कुटुंबाला बलात्कार आणि जीवे मारण्याच्या धमक्याही दिल्या आहेत. अविनाशच्या सोशल मीडियावर एक निवेदन सादर करण्यात आले आहे. खेळ हा खेळासारखा खेळला पाहिजे, असे निवेदनात म्हटले आहे. तुम्ही तुमच्या आवडत्या स्पर्धकाला सपोर्ट करू शकता, पण सपोर्ट करण्याच्या नावाखाली तुम्ही सीमा ओलांडू शकत नाही, असे यात म्हटले आहे.

# विवेक ओबेरॉयची 1.55 कोटीची फसवणूक

बॉलिवूड अभिनेता विवेक ओबेरॉयची १.५५ कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. अभिनेत्याने त्याचे अकाउंटंट देवेन बाफना यांच्यामार्फत स्वतःचे व्यावसायिक भागीदार संजय सहा, नंदिता सहा आणि राधिका नंदा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे अभिनेत्याने आरोप केला आहे की, त्याच्या तीन भागीदारांनी चित्रपट बनवण्यामध्ये आणि कार्यक्रम आयोजित करण्यात गुंतलेल्या कंपनीत गुंतवणूक करण्याच्या नावाखाली त्याच्याकडून 1.55 कोटी रुपये घेतले होते, परंतु ते पैसे



त्यांच्या वैयक्तिक वापरासाठी गुंतवले. आता मुंबईचे एमआयडीसी पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत. बुधवारी अभिनेत्याचे सीए देवेन यांनी अंधेरी पूर्व येथील एमआयडीसी पोलिस ठाण्यात तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. देवेनने आपल्या वक्तव्यात म्हटले आहे - विवेकच्या कुटुंबाने 2017 मध्ये ओबेरॉय ऑरगॅनिक्स नावाची कंपनी सुरू केली. ते फारसे चांगले काम करत नसल्यामुळे, त्यांनी फर्ममध्ये तिघांना (जे आता आरोपी आहेत) भागीदार म्हणून आणण्याचा निर्णय घेतला. यानंतर विवेकने हा व्यवसाय विसर्जित केला आणि आनंदिता एंटरटेनमेंटच्या नावाने त्याचे इव्हेंट व्यवसायात रूपांतर केले.

# भारत-पाकिस्तान महामुकाबला

## आशिया चषक 2023 च्या उपांत्य फेरीत बांगलादेशचा 51 धावांनी पराभव

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**पुरुष उदयोन्मुख संघ आशिया चषक २०२३ च्या उपांत्य फेरीत भारत अ ने बांगलादेश अ संघाचा ५१ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने २१२ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात बांगलादेश अ संघ १६० धावांवर गारद झाला. आता अंतिम फेरीत भारत अ संघ पाकिस्तान अ संघाशी भिडणार आहे.**



पहिल्या उपांत्य फेरीत पाकिस्तान अ संघाने श्रीलंका अ संघाचा ६० धावांनी पराभव केला. टीम इंडियाकडून सेमीफायनलमध्ये निशांत सिंधूने ५ विकेट्स घेतल्या. प्रथम फलंदाजी करताना भारत अ संघाने ४९.१ षटकांत सर्वबाद २११ धावा केल्या. यादरम्यान यश धुलने कर्णधारपदाला साजेशी खेळी खेळली. त्याने ८५ चेंडूत ६६ धावा केल्या. यशने ६ चौकार मारले. अभिषेक शर्माने ६३ चेंडूत ३४ धावा केल्या. त्याने २ चौकार आणि १ षटकार लगावला. सलामीवीर साई सुदर्शनने २४ चेंडूत २१ धावा केल्या. त्याच्या खेळीत ३ चौकारांचा समावेश होता. रियान पराग विशेष काही करू शकला नाही. तो १२ धावा करून बाद झाला. निकिन जोसने १७ धावांचे योगदान दिले. मानव सूधरने २१ धावांची खेळी खेळली. त्याने ३ चौकार मारले. भारताने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशचा संघ १६० धावांवर गारद झाला. बांगलादेशकडून तंजीम हसनने ५१ धावांची शानदार खेळी केली. त्याने ५६ चेंडूंचा सामना करत ८ चौकार मारले. मोहम्मद नईमने ३८ धावांचे योगदान दिले. कर्णधार सैफ हसनने २२ धावांची खेळी केली, हसन जॉयने २० धावा केल्या. याशिवाय कोणीही विशेष काही करू शकले नाही.

अशाप्रकारे बांगलादेशला ५१ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. आता अंतिम फेरीत भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. टीम इंडियासाठी निशांत सिंधूने शानदार गोलंदाजी केली. त्याने ८ षटकात २० धावा देत ५ विकेट्स घेतल्या. मानव सूधरने ८.२ षटकात ३२ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. अभिषेक शर्माने ३ षटकात २१ धावा देत १ विकेट आणि युवराज सिंग डोडियाने ७ षटकात ३५ धावा देत १ विकेट घेण्यात यश मिळाले.

### इंडिया चॅम्पियन होण्यासाठी प्रबळ दावेदार

पहिल्या उपांत्य फेरीत पाकिस्तानने श्रीलंकेचा ६० धावांनी पराभव केला आणि या स्पर्धेची अंतिम फेरी गाठणारा पहिला संघ ठरला. आता भारताने दुसरा उपांत्य सामना जिंकून अंतिम फेरीतही मजल मारली आहे. २३ जुलै रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात अंतिम सामना होणार आहे. या स्पर्धेत भारतीय संघाने पाकिस्तानचा आठ गडी राखून पराभव केला आहे. उपांत्य फेरीच्या सामन्यापूर्वी भारताने पाकिस्तानचा पराभव केला. अशा स्थितीत टीम इंडिया चॅम्पियन होण्यासाठी प्रबळ दावेदार आहे.

# रविचंद्रन अश्विनचा कारनामा

## सहाव्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारत आणि वेस्ट इंडिज संघांत दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना त्रिनिदाद येथे खेळवला जात आहे. या सामन्यात भारताने प्रथम फलंदाजी करतान आपल्या पहिल्या डावात सर्वबाद ४३८ धावा. या सामन्यात विराट कोहली पाठोपाठ रविंचंद्रन आश्विन देखील अश्विन उत्कृष्ट लयीत दिसत आहे.**

पहिल्या सामन्यात शानदार गोलंदाजी केल्यानंतर दुसऱ्या कसोटीतही त्याने आपल्या बॅटने एक पराक्रम केला आहे. भारतीय संघाचा माजी कर्णधार विराट कोहली आणि जडेजाच्या महत्त्वपूर्ण विकेट पडल्यानंतर आश्विनने भारतीय संघाचा डाव सावरला. या दरम्यान रविचंद्रन आश्विनने ५६ धावांची खेळी केली. यासह त्याने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. रविचंद्रन आश्विन सहाव्या क्रमांकाच्या खाली फलंदाजी करताना भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा तिसरा खेळाडू बनला आहे. त्याने या बाबतीत अनुभवी फलंदाज व्हीव्हीएस लक्ष्मणला मागे टाकले आहे. व्हीव्हीएस लक्ष्मणने सहाव्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना ३१०८ धावा केल्या आहेत. त्याचबरोबर अश्विनच्या आता ३१८५ धावा झाल्या आहेत. या यादीत कपिल देव यांच्या नावावर ५११६ धावा आहेत. एमएस धोनी दुसऱ्या क्रमांकावर आहे. या यादीत तिसरे स्थान



मिळविल्यानंतर अश्विन हा धोनी आणि कपिल देव यांच्यानंतरचा तिसरा खेळाडू ठरला आहे. आर अश्विनने आपल्या कसोटी कारकिर्दीत आतापर्यंत फलंदाजीत करताना १३२ डावांमध्ये २७.२२ च्या सरासरीने ३१८५ धावा केल्या आहेत. दरम्यान, त्याने ५ शतके आणि १४ अर्धशतकेही झळकावली आहेत. गोलंदाजीत त्याने १७६ डावात २३.६१ च्या सरासरीने ४८६ विकेट्स घेतल्या आहेत. त्याने ३४ वेळा पाच विकेट्स घेतल्या आहेत. तसेच तो भारतासाठी कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक विकेट्स घेणारा दुसरा गोलंदाज आहे.

### रविचंद्रन अश्विनची कसोटी कारकीर्द

सामन्याबद्दल बोलायचे तर, वेस्ट इंडिजविरुद्ध भारतीय संघाचा पहिला डाव ४३८ धावांवर आटोपला, ज्यामध्ये विराट कोहलीच्या बॅटमधून १२१ धावांची खेळी पाहिला मिळाली. त्याने २०६ चेंडूचा सामना करताना ११ चौकार लगावले. तसेच कर्णधार रोहित शर्माने ८०, रवींद्र जडेजाने ६१, तर यशस्वीने ५७ आणि अश्विनने ५६ धावांचे योगदान दिले. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा वेस्ट इंडिज संघानेही १ गडी गमावून ८६ धावा केल्या होत्या.

# कोरिया ओपन : सात्विक-चिराग अंतिम फेरीत

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारतीय बॅडमिंटनपटू सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने कोरिया ओपन सुपर 500 स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. जागतिक क्रमवारीत-3 भारतीय जोडीने गतविजेत्या चीनच्या वेई केंग लियांग-चांग वांग या जोडीचा सरळ गेममध्ये पराभव केला.

भारतीय जोडीने दुसऱ्या मानांकित चीनच्या जोडीचा 21-15, 24-22 असा पराभव केला. आतापर्यंत झालेल्या तीन सामन्यांमध्ये सात्विक-चिराग जोडीने वेई कांग आणि वांग चांग या जोडीला पराभूत करण्याची ही पहिलीच वेळ आहे. भारतीय जोडीने या वर्षातील त्यांच्या तिसऱ्या BWF वर्ल्ड टूरच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. सात्विक-चिराग जोडीने उपांत्य फेरीत जपानच्या ताकुरो होकी आणि युगो कोबायाशी जोडीचा 21-14, 21-17 असा सरळ



गेममध्ये पराभव केला होता.

हा सामना 40 मिनिटे चालला. भारतीय जोडीने पहिला गेम जिंकून बरोबरीत दमदार सुरुवात केली. सात्विक-चिराग जोडीने पहिला गेम 21-14 असा जिंकला. भारतीय जोडीने दुसऱ्या गेमलाही आक्रमक सुरुवात केली. रोमहर्षक खेळात भारतीय शटलर्सनी चीनच्या जोडीचा 24-22 असा पराभव करत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.पीव्ही सिंधू, एचएस प्रणॉय आणि किदाम्बी श्रीकांत यांसारखे उर्वरित भारतीय खेळाडू याआधीच स्पर्धेतून बाहेर पडले असल्याने या स्पर्धेतील भारतीय आशा सात्विक-चिराग जोडीवर टिकून आहेत. कोरिया ओपनचा निकाल पॅरिस 2024 ऑलिम्पिकसाठी खेळाडूंच्या पात्रता क्रमवारीत गणला जाईल.